ePaper

## राज्यपालांविरोधात मुस्लीम संघटना आक्रमक, पुण्यातील बंदला पाठिंबा



| वर्ष - 6 । अंक - 234 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | गुरुवार । दिनांक 8 डिसेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत

- पुणे बंदची १३ डिसेंबरला हाक
- बैलगाडा शर्यतीवर अंतिम सुनावणी
- "आप"ने खुणावले, आता महाराष्ट्रात येऊ का 'झाडू' मारायला?

# पुणे-मुंबई महामार्गावर बेकायदा प्रवासी वाहतूक!

## वाहतूक पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष : नवले ब्रिजच्या धर्तीवर अपघाताचा धोका



**।पिंपरी।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पुणे-मुंबई महामार्गावर मुंबई आणि सातारा-कोल्हापूरच्या दिशेने होणारी बेकायदा प्रवासी वाहतूक प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक आहे. या महामार्गावरील नवले ब्रिज आणि लोणावळा, खंडाळा घाटातील अपघातांची वाढती संख्या पाहता अवैध प्रवासी वाहतूक म्हणजे नागरिकांच्या जीवाशी खेळ आहे. मात्र, याबाबत पिंपरी-चिंचवड वाहतूक पोलीस प्रशासनाकडून कारवाईकडे कानाडोळा केला जात आहे.**

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतून जाणाऱ्या पुणे-मुंबई महामार्गावरील वाकड, भूमकर चौक, ताथवडे, रावेत या गावांना जोडणाऱ्या ठिकाणी मुख्य महामार्गावर बेकायदेशीरपणे प्रवासी वाहतूक केली जात आहे. मुंबईसह सातारा-कोल्हापूरच्या दिशेने प्रवास करणारे प्रवासी मुख्य रस्त्यावरच उभे असतात. प्रवासी वाहतूक करणारी वाहने ही प्रवासी वाहतूक परवानाधारक नसतात.

खासगी वाहनांमधून आसनक्षमतेपेक्षा जास्त प्रवासी बसवून वाहतूक केली जाते. प्रवासी मुख्य रस्त्यावर आणि संबंधित वाहनांमुळे ऐन रहदारीच्या वेळी संबंधित चौकात वाहतूक कोंडी होते. परिणामी, सामान्य वाहनचालक आणि प्रवाशांना नाहक मन:स्ताप सहन करावा लागतो.

### स्पॉट शोधा अन् कारवाई करा...

वाकड ते रावेत या महामार्गावर अवैध प्रवासी वाहतूक होणारे 'स्पॉट' तात्काळ निश्चित करावेत. त्याद्वारे स्थानिक पोलीस प्रशासनाला कारवाईचे आदेश द्यावेत. काही दिवसांपूर्वी, नवले ब्रिज येथे भीषण अपघात झाला होता. लोणावळा आणि खंडाळा परिसरातील अपघातांचे सत्र सुरू आहे. तशीच परिस्थिती वाकड ते रावेत या पट्ट्यात होण्याचा धोका आहे. त्यामुळे प्रशासनाने तात्काळ कारवाई करावी, अशी अपेक्षा स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.

### ताथवडे, भूमकर चौकात धोकादायक परिस्थिती...

पुणे-मुंबई महामार्गावरीत ताथवडे ते भूमकर चौक भागात डॉ. डी. वाय. पाटील, जे.एस.पी.एम., इंदिरा इंटरनॅशन स्कूल आदी मोठ्या शिक्षण संस्था आहेत. सकाळच्या सत्रात शाळा-महाविद्यालयांमध्ये जाण्यासाठी विद्यार्थी-पालकांची लगबग सुरू असते. अशा परिस्थितीत इंदिरा नॅशनल स्कूलच्या समोर मोठ्या प्रमाणात अवैध प्रवासी वाहतूक करणारी वाहने उभी असतात. परिणामी, गुजरात- राजस्थान राज्यात जाणाऱ्या मोठ्या बसेसही रस्त्याच्या कडेला पार्क केलेल्या असतात. सर्व्हिस रस्ता आणि मुख्य रस्ता बेकायदेशी प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे अरुंद होतो. परिणामी, वाहतूक कोंडी होवून नागरिकांना मन:स्ताप सहन करावा लागत आहे.

# बाळासाहेबांच्या शिवसेनेचा 'हुंकार'



**।पिंपरी-चिंचवड।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**बाळासाहेबांची शिवसेनेच्या मावळ जिल्हाप्रमुखपदी बाळासाहेब वाल्हेकर तर पिंपरी-चिंचवड शहरप्रमुखपदी निलेश तरस यांची निवड करण्यात आली आहे.**

पिंपरी-चिंचवड युवासेना प्रमुखपदी विश्वजीत बारणे, महिला संघटिकापदी सरिता साने आणि युवती विस्तारकपदी शर्वरी गावडे यांची नियुक्ती करण्यात आली. तर, मावळ तालुकाप्रमुखपदी राजेश खांडभोर यांची नियुक्ती केली. बाळासाहेबांची शिवसेनेचे उपनेते, मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी आज (बुधवारी) पदाधिकारी जाहीर केले. 200 पदाधिकायांची नियुक्ती करण्यात आली. बाळासाहेबांची शिवसेनेचा पदाधिकारी नियुक्ती मेळावा खासदार बारणे यांच्या प्रमुख उपस्थितीत ऑटो क्लस्टर येथे पार पडला. उपनेते, कामगार नेते इरफान सय्यद उपस्थित होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार, पिंपरी, चिंचवड आणि मावळचे पदाधिकारी जाहीर करण्यात आले.

पिंपरी-चिंचवडच्या उपजिल्हाप्रमुखपदी राजेश वाबळे, मावळच्या उपजिल्हाप्रमुखपदी शरद हुलावळे, मावळ जिल्हा संघटकपदी अंकुश देशमुख, पिंपरी-चिंचवड उपशहरप्रमुख बशीर सुतार, दत्तात्रय भालेराव, पिंपरी विधानसभा प्रमुखपदी रुपेश कदम, चिंचवड विधानसभा प्रमुखपदी सुरेश राक्षे, पिंपरी-चिंचवड शहर संघटकपदी सोमनाथ गुजर, रवींद्र ब्रम्हे, हाजी शेख, पिंपरी विधानसभा संघटकपदी सय्यद पटेल, उपविधानसभा संघटकपदी शरद मुळे, ॲड. मुकुंद ओव्हाळ, नामदेव घुले, पिंपरी विधानसभा संघटकपदी नरेश टेकाडे, संदीप पवार, निखील येवले, पिंपरी विधानसभा समन्वयक सुनील पाथरमल, ॲड.

### महापालिका निवडणुकीची तयारी : जिल्हाप्रमुखपदी वाल्हेकर, शहरप्रमुखपदी तरस

दिलीप पाटील, रुपेश चांदेरे, चिंचवड उपविधानसभा संघटकपदी राजेश अडसूळ, अंकुश कोळेकर, प्रशांत कडलग, महेश कलाल, चिंचवड विधानसभा संघटकपदी रोहिदास दांगट, संतोष बारणे, सुदर्शन देसले, चिंचवड विधानसभा समन्वयकपदी प्रदीप दळवी, हेमचंद्र जावळे, मयूर तरस, प्रसिद्धी प्रमुखपदी सागर पाचारणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पिंपरी-चिंचवड शहर युवती संघटिकापदी शर्वरी गावडे, चिंचवड विधानसभा संघटिकापदी श्वेता कापसे, चिंचवड उपविधानसभा संघटिकापदी वैष्णवी जाधव, समन्वयकपदी रितू कांबळे यांची निवड करण्यात आली. याशिवाय पिंपरी-चिंचवड व्यापारी सेलच्या अध्यक्षपदी किशोर केसवानी, चित्रपट व सांस्कृतिक विभागाच्या अध्यक्षपदी चंद्रकांत गांगड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आगामी महापालिका निवडणूक पूर्ण ताकदीनिशी लढणार - बारणे

खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, "बाळासाहेबांची शिवसेनेची पदाधिकारी पक्षाचे काम जोमाने करतील. पक्षाचे मुख्य नेते, राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली जोमाने पक्ष संघटन वाढविले जाईल. शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकार जनतेच्या हिताचे निर्णय घेत आहे.

# पुणे बंदची 13 डिसेंबरला हाक!

## विरोधी पक्ष, समविचारी संघटनांची एसएसपीएम महाविद्यालयाच्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर बैठक

**पिंपरी । ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**छत्रपती शिवाजी महाराज आणि महापुरुषांबद्दल भाजपचे नेते वारंवार वादग्रस्त विधान करत असले तरी त्यांच्यावर कोणतीही कारवाई होत नसल्याच्या विरोधात १३ डिसेंबर रोजी पुणे बंदची हाक देण्यात आली आहे. यासंदर्भात विरोधी पक्ष, समविचारी संघटनांची एसएसपीएम महाविद्यालयाच्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर बैठक झाली. त्यात हा निर्णय घेण्यात आला.**



संभाजी ब्रिगेड, राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, जनता दल, आंबेडकर चळवळीतील संघटनांचा पाठिंबा आहे. राज्यपाल भगतसिंह कोशारी हे वादग्रस्त वक्तव्य करत शिवाजी महाराज व इतर महापुरूषांचा वारंवार अवमान करत आहेत. प्रसाद लाड, मंगल प्रभात लोढा व रावसाहेब दानवे यांनीही वक्तव्य केले आहेत.

हे प्रकार वारंवार होत असल्याने शिवप्रेमी शांत बसणार नाहीत. म्हणून या सगळ्यांची हकालपट्टी करावी. यांच्यावर कठोर शासन करावे अशी भूमिका बैठकीत उपस्थितांनी मांडली. त्यामुळे शिवप्रेमी नागिकांच्यावतीने च्या १३ डिसेंबर रोजी पुणे बंद आंदोलन करण्याचा निर्णय घेतला, अशी माहिती संभाजी ब्रिगेडचे प्रदेश संघटक संतोष शिंदे यांनी दिली.

या बैठकीस अरविंद शिंदे, प्रशांत जगताप, संजय मोरे, गजानन थरकुडे, बाळासाहेब अमराळे, सचिन आडेकर, अविनाश मोहिते, रवींद्र माळवदकर आदी उपस्थित होते.

---

# लम्पीबाधित पशूंवर ऑनलाइन उपचार


## पुणे जिल्हा परिषदेचा अनोखा उपक्रम

**पुणे । ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**लम्पी त्वचा रोग बाधित पशूंना ऑनलाइन उपचाराची (टेलिमेडिसीन) सोय पुणे जिल्हा परिषदेने सुरू केली आहे. बुधवारी (७ डिसेंबर) लम्पी आजाराने गंभीर असलेल्या २८ जनावरांवर ऑनलाइन पद्धतीने उपचार करण्यात आले.**

या बाबत माहिती देताना पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आयुष प्रसाद म्हणाले, पुणे जिल्ह्याच्या काही भागात लम्पीबाधित जनावरे आढळून येत आहेत. जिल्ह्यात लम्पी त्वचा रोग सक्रिय असलेल्या पशूंची संख्या ६०० आहे; पण लसीकरण मोहीम आणि पशुसंवर्धन विभागाच्या उपचारामुळे त्यांना सौम्य लक्षणे आहेत. जिल्ह्यात २५ फिरती पथके पशूंवर उपचार करीत आहेत. त्यासाठी शिरवळ येथील सरकारी पशुवैद्यकीय महाविद्यालयातील तज्ज्ञांची मदत होत आहे.

जिल्हा परिषदेच्या वतीने बुधवारी लम्पीबाधित पशूंवर ऑनलाइन उपचार करण्याचा उपक्रम सुरू केला आहे. लम्पीबाधित संशयित २८ पशू आढळल्यानंतर पशुवैद्यकांचे पथक घटनास्थळी गेले. त्याच वेळी पुणे जिल्हा परिषदेत तज्ज्ञ पशुवैद्यक बसले होते. घटनास्थळी गेलेल्या पशूवैद्यकांनी दृकश्राव्य संवादाद्वारे बाधित जनावराची माहिती पुण्यात बसलेल्या तज्ज्ञांना सांगितली. तज्ज्ञांनी दृकश्राव्य संवादाद्वारे तेथील पशुवैद्यक आणि पशुपालकांकडून लम्पी रोगाची तीव्रता, लक्षणे, अगोदर झालेले उपचार आदींची माहिती घेतली. त्यानंतर पुढील उपचारा बाबत मार्गदर्शन केले.



### ऑनलाइन उपचाराद्वारे तज्ज्ञांचा सल्ला मिळणार

लम्पीबाधित पशूंसाठी उपचार पद्धती विकसित करणारे आणि संशोधनात्मक काम करणाऱ्या तज्ञ पशुवैद्यकांची संख्या कमी असल्यामुळे तज्ञ पशुवैद्यकांना ग्रामीण भागात, प्रत्यक्ष पशुपालकांच्या गोठ्यावर जाऊन उपचार करणे शक्य होत नाही. कमी वेळेत जास्तीत-जास्त बाधित पशूंना उपचार मिळावेत. गंभीर आजारी असलेल्या पशूंना अचूक सल्ला मिळवा, यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला आहे. या उपक्रमामुळे लम्पीबाधित पशूंवर ऑनलाइन उपचारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. लम्पी बाधित जनावरांवर उपचार करण्यासाठी आणि त्यांचा मृत्यू रोखण्यासाठी हा उपक्रम यापुढेही सुरू ठेवणार आहोत, असेही आयुष प्रसाद म्हणाले.

---

# एसटी बंद झाल्याने संतप्त झालेल्या विद्यार्थ्यांने एसटी अडवून केले आंदोलन

**पुणे। ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

पारगाव - आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात एसटीच्या फेऱ्या कमी झाल्याने विद्यार्थ्यांचे अतोनात हाल होऊ लागले आहे. बाहेरगावी शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना घरी जाण्यासाठी रात्रीचे आठ साडेआठ वाजु लागल्याने संतप्त झालेल्या विद्यार्थ्यांने आज बुधवारी सायंकाळी अवसरी बुद्रुक येथील बसस्थानकावर एसटी बस अडवून तीव्र घोषणाबाजी करत आंदोलन केले. यावेळी सुमारे 100 हुन अधिक विद्यार्थी उपस्थित होते. मंचर बसस्थानकातून नवीन एसटी आल्याने आंदोलन थांबवण्यात आले.

अवसरी बुद्रुक येथील विद्या विकास मंदिर विद्यालय येथे परिसरातील सुमारे 45 किलोमीटर परिसरातून विद्यार्थी शिक्षणासाठी येतात. विद्यालयाची पटसंख्या 1500 पेक्षा जास्त आहे. विशेष करून पूर्वभागातील गावातून मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी येत असतात. परंतु, अलीकडच्या सहा महिन्यांपासून एसटी महामंडळाने पूर्व भागातील एसटीच्या अनेक फेऱ्या बंद केल्या आहे.

त्यामुळे शाळा सुटल्यानंतर विद्यार्थ्यांना बसस्थानकावर दोन दोन तास एसटीची वाट पहात थांबावे लागत आहे. घरी जाण्यास रात्रीचे आठ वाजत असल्याची खंत विद्यार्थिनी वर्षा भोजने हिने व्यक्त केली. आजही शाळा सुटल्यानंतर सुमारे अर्ध्या तासाने मंचर पाबळ एसटी आली. परंतु, ती मंचरहून प्रवाशांनी भरून आल्याने एसटीत जागा नसल्याने विद्यार्थी संतप्त झाले. त्यांनी एसटी अडवून घोषणाबाजी करत आंदोलन केले. यावेळी प्रशांत बबनराव हिंगे, अजित वाडेकर, सुनील पांडुरंग हिंगे व शिक्षक उपस्थित होते. काही वेळाने मंचर जारकरवाडी एसटी आल्यानंतर आंदोलन स्थगित केले. पूर्व भागातील सर्वच बंद झालेल्या एसटी पुन्हा सुरू करण्यासाठी महामंडळाला निवेदन दिले असून, आज काही मार्गावरील नवीन चार एसटी सुरू झाल्याचे निरगुडसर चे माजी उपसरपंच रामदास वळसे पाटील यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांच्या मागणीचा विचार करून पूर्व भागातील बंद झालेल्या एसटी बस उद्यापासून सुरू होणार असल्याचे सांगितले. काही बसेस आजच सुरू केल्याचे सांगितले.



# बैलगाडा शर्यतीवर अंतिम सुनावणी!

## सर्वोच्च न्यायालयात लढा : आमदार महेश लांडगे आणि टीमचा दिल्लीत मुक्काम

पिंपरी ।
। महाईन्यूज ।

**राज्यातील शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा विषय असलेल्या बैलगाडा शर्यतींवर बंदी कायमस्वरुपी उठवण्याबाबत सर्वोच्च न्यायालयात अंतिम सुनावणी सुरू आहे. राज्यासह देशभरातील बैलगाडा प्रेमी, संघटनांचे पदाधिकारी यांचे या सुनावणीकडे लक्ष लागले आहे.**



भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांच्यासह अखिल भारतीय बैलगाडा संघटनेचे अध्यक्ष नितीन आबा शेवाळे, संदीप बोदगे, रामकृष्ण टाकळकर यांच्या टीमने गेल्या दोन दिवसांपासून दिल्लीत मुक्काम केला आहे. बुधवारी या सुनावणीला सुरूवात झाली. त्यानंतर पुन्हा गुरूवारी दुपारी दोन्ही पक्षांकडून युक्तिवाद करण्यात आला.

बैलगाडा शर्यतीबाबत अंतिम सुनावणी सर्वोच्च न्यायालयात पाच न्यायाधीशांच्या घटनापीठासमोर सलग चालू आहे. तमिळनाडूच्या वतीने सीनियर कौन्सिल मुकुल रोहोतगी यांनी जोरदार यूक्तिवाद करत जल्लीकट्टूबाबत प्राचीन संस्कृती परंपरा, सरकारने केलेला कायदा याबाबत अभ्यासपूर्ण निवेदन केले. तसेच, राज्यातील अखिल भारतीय बैलगाडा संघटनेकडून ॲड. आनंद लांडगे यांनी महाराष्ट्र सरकारने केलेला कायदा सक्षम असल्याचे सांगत मागील वर्षी न्यायालयाने परवानगी दिल्यानंतर राज्यात नियमानुसार शर्यती चालू आहेत तसेच कोणताही गैरप्रकार होत नसल्याचे युक्तीवाद केला, अशी माहिती संदीप बोदगे यांनी दिली.

### महिनाभरात अंतिम निकालाचा अंदाज : महेश लांडगे



**आमदार महेश लांडगे म्हणाले की, महाराष्ट्रातील बैलगाडा शर्यतीचे बाजूने राज्य शासनाकडून सिनियर कौन्सिल तुषार मेहता यांनी युक्तीवाद केला. महाराष्ट्रातील बैलगाडा शर्यतीची संस्कृती परंपरा शासनाने केलेला कायदा शासनाने धावण्याच्या क्षमते बाबत नेमलेली समिती इत्यादी बाबींचा उल्लेख करत न्यायालयाचे लक्ष वेधले. राज्य शासनाच्या वतीने दुसरे सीनियर कौन्सिल सिद्धार्थ भटनगर यांनीही युक्तिवाद केला. उद्या दुपारी दोन वाजता सुनावणी चालू होईल व उद्या सुनावणी पूर्ण होईल. निकाल महिनाभरात लागेल असा अंदाज आहे.**

---

# अर्बन स्ट्रीटच्या नावाखाली जनतेच्या पैशाची लूट!

## अजित गव्हाणे यांची टीका : चार वर्षात ठोस काम नसताना 34 कोटींचा खर्च

पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वाहतूक कोंडी दूर करणे, सुशोभीकरण या नावाखाली भोसरीतील राजमाता जिजाऊ उड्डाणपूला खाली 2019 सालापासून अर्बन स्ट्रीटचे काम हाती घेण्यात आले.सुमारे 34 कोटी रुपयाहून अधिक खर्च या कामासाठी करण्यात आला आहे. मात्र अद्यापही ठोस असे कोणतेही काम दिसत नाही. उलटपक्षी केलेले काम उखडून पुन्हा नव्याने कामे केली जात आहे. ही निव्वळ जनतेच्या पैशाची लूट असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी मंगळवारी केला.**

> भोसरीमध्ये संध्याकाळच्या सुमारास वाहतुकीचा खोळंबा नित्याचा झालेला आहे . रोजच्या किरकोळ अपघातांचे प्रमाण वाढले आहे. नागरिक, वाहनचालक, वाहतूक पोलिस सगळेच या फूटपाथमुळे त्रासलेले असताना काही लोकांच्या हट्टापायी ही कामे सुरू आहेत. मात्र ही केवळ करदात्यांच्या पैशाची निव्वळ उधळपट्टी आहे. ३४ कोटींचा खर्च नक्की कुठे मुरला याबाबत चौकशी झाली पाहिजे. महापालिका आयुक्तांनी याबाबत तात्काळ उपाययोजना करणे गरजेचे झाले आहे.
>
> **- अजित गव्हाणे,**
> **शहराध्यक्ष, पिंपरी चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेस**



भोसरी राजमाता जिजाऊ उड्डाणपुलाच्या दोन्ही बाजुला धावडेवस्ती, अंकुशराव लांडगे नाट्यगृहापर्यंत आणि स्मशान भूमीच्या रस्त्यावर अर्बन स्ट्रीटचे काम सुरू आहे.



मंगळवारी ( दि. 6) शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी या कामाची पाहणी केली. यावेळी बोलताना ते म्हणाले, भाजपच्या सत्ता काळात अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार फूटपाथ ही संकल्पना अगदी जोमात सुरू झाली. 2019 मध्ये भाजपची सत्ता आल्यानंतर सर्वप्रथम भोसरीमध्ये अर्बन स्ट्रीटच्या नावाखाली फुटपाथ मोठे केले.

राजमाता जिजाऊ उड्डाणपुलाखाली धावडे वस्ती ते अंकुशराव लांडगे सभागृह स्मशानभूमी रस्ता तसेच मंकीकर हॉस्पिटलपर्यंत अर्बन स्ट्रीटचे काम हाती घेण्यात आले. गेल्या चार वर्षात पालिकेने तब्बल 34 कोटी या कामावर खर्च केला. मात्र ठोस असे काहीच अद्यापही दिसत नाही.

उड्डाणपूलाखाली चांदणी चौकामध्ये गार्डन आणि लँडस्केपिंग करण्याचे प्रस्तावित होते. त्यासाठी बैठक व्यवस्था करण्यात आली. ब्लॉक बसवण्यात आले.

मात्र आता हे सर्वच उघडून टाकण्यात आले आहे. काम सुरू करण्यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसने या कामाला प्रचंड विरोध केला होता. मात्र नगरसेवकांचे म्हणणे ऐकून न घेता हे काम रेटून देण्यात आले. त्याचेच परिणाम आता दिसत आहे. या कामावर झालेला खर्च म्हणजे निव्वळ जनतेच्या पैशाची लूट करण्यात आली आहे.

### टक्केवारीसाठी रस्त्यांचा गळा घोटण्याचे काम

**अर्बन स्ट्रीटच्या नावाखाली भाजपच्या काही लोकांनी जनतेच्या पैशाची लूट केली. या कामांतर्गत फुटपाथ मोठे करण्यात आले. रस्त्यावर चालणाऱ्या पादचाऱ्यांची सर्वात मोठी गरज म्हणून ही कामे सुरू झाली. ४५-६० फूट रस्त्यावर दोन्ही बाजुला दहा ते पंधरा फूट रुंदिचे फूटपाथ बांधले आहेत. त्याची खरोखर गरज आहे का ते पाहिले जात नाही. त्यातून रस्त्यांची रुंदी कमी झाली आहे. प्रशस्त रस्त्यांचे बोळकांड झाल्याचे अनेक दाखले आहेत. अर्बन स्ट्रीट योजनेतील या फूटपाथमुळे भोसरीतील उड्डाणपुलाखालील रस्ता अगदी चिंचोळा झाला आहे . काही लोकांच्या टक्केवारीसाठी या रस्त्यांचा अक्षरशः गळा घोटण्याचे काम आजही वेगात सुरू आहे. ही लोकांची गरज नाही, तर गैरसोय आहे. सुशोभिकरणाच्या नावाखाली ही कामे रेटून नेली जात आहेत. या कामांमुळे जागोजागी वाहतुकीची कोंडी दिसून येत आहे**

**भोसरी उड्डाण पुलाच्या दोन्ही बाजुला धावडे वस्ती अंकुशराव लांडगे नाट्यगृहापर्यंत आणि स्मशानाच्या रस्त्यावर फूटपाथ बांधल्याने भोसरीकर जाम वैतागलेत.रोज अक्षरशः वाहतुकीचा बट्ट्याबोळ होतो. सायंकाळी लोक खरेदीसाठी बाहेर पडतात, त्यावेळी भाजीमंडई, मासे विक्रेते, वडापावच्या हातगाड्यांनी फूटपाथ गजबजून जातो. महापालिकेचे अतिक्रमण पथक आले की किरकोळ कारवाई करते आणि तासाभरात परिस्थिती जैसे थे होते.**

# ‘आप’ने खुणावले, आता महाराष्ट्रात येऊ का ‘झाडू’ मारायला?



## भूमिका

-सुनील आढाव
कार्यकारी संपादक



**देशाची राजधानी दिल्ली आणि पंजाबमध्ये आम आदमी पक्षाने झेंडा फडकवल्यानंतर आता आप् मुंबईसह महाराष्ट्रातील इतर महापालिका निवडणुकीत स्वबळावर लढणार आहे. महापालिका निवडणुकीचे वारे सध्या राज्यात वाहत आहे. मुंबई, पुण्यासाठी राज्यातील महत्वाच्या महापालिका निवडणुका तोंडावर आल्या आहेत. त्यादृष्टीने मुंबई महापालिका निवडणुकीसाठी सत्ताधारी शिवसेनेसह, राष्ट्रवादी आणि काँग्रेसनेही जोरदार तयारी सुरु केल्याचे पाहायला मिळत आहे. तर भाजपही आक्रमक पवित्रा घेत शिवसेनेवर जोरदार हल्ला चढवताना दिसून येत आहे. अशावेळी देशाची राजधानी दिल्ली आणि पंजाबमध्ये आपला झेंडा गाडल्यानंतर दिल्ली महापालिकेवर दीड दशकानंतर आपने झेंडा फडकविला आहे. आता केजरीवालांनी अप्रत्यक्ष संकेत दिले आहेत. महाराष्ट्रात ‘येऊ का झाडू मारयला?’ दिल्लीत आपने करून दाखवलं... 15 वर्षांच्या भाजपच्या सत्तेला खिंडार पाडले आहे. आम आदमी पक्ष मुंबई महापालिका निवडणुकीत स्वबळावर लढणार आहे. तर ‘दिल्ली बदली अब मुंबई की बारी...’ असा नारा आपने दिला आहे. केवळ 10 वर्षांच्या आपने हे सगळं करून दाखवलं... महाराष्ट्रातील प्रादेशिक पक्ष का करू शकत नाहीत.**

दिल्ली महापालिका निवडणुकीत आम आदमी पक्षाने कमाल केली आहे. पंधरा वर्षांपासून दिल्ली महापालिकेवर सत्ता असणाऱ्या भाजपला हरवून आम आदमी पक्षाला बहुमत मिळाले आहे. या निवडणुकीत मुख्य लढत आप, भाजप आणि काँग्रेसमध्येच होती. भाजपने कडवी लढत दिली आहे. तर काँग्रेसला दुहेरी आकडा गाठण्यासाठी कष्ट करावे लागले.

सीएमडी विजयानंतर अरविंद केजरीवाल दिल्लीवासियांना संबोधित करते वेळी म्हणाले...सकारात्मक राजकारण करा, नकारात्मक राजकारण करू नका, असा मोठा संदेश दिल्लीच्या जनतेने आज दिला आहे. आम्ही शिवीगाळ करत नाही, आम्ही भांडत नाही.आज जनतेने भ्रष्टाचारमुक्तीची जबाबदारी दिली आहे, उद्याने स्वच्छ करण्याची जबाबदारी आहे. या विश्वासाचे ऋण मी कधीच फेडू शकणार नाही. हे काम मी रात्रंदिवस पूर्ण करेन. हा आमचा प्रयत्न असेल. निवडणूक जिंकण्यासाठी जे करायचे होते ते आम्ही केले, आता आम्ही सर्व मिळून दिल्ली ठीक करू. मी भाजपचे सहकार्य घेणार असून काँग्रेसकडूनही सहकार्य घेणार आहे. ज्यांनी आम्हाला मतदान केले त्यांचे आभार, पण ज्यांनी मतदान केले नाही, त्यांची कामे आधी करून घेऊ. केजरीवांची भूमिका गुलाल तिकडे चांगभलं अशी मूळीच नाही. सर्वांना सोबत घेऊन, परस्परांमध्ये मतभेत असलेल्यांचे सर्वप्रथम एकमत करून विकासाच्या मुद्द्यांवर वाटचाल करण्याची ही पद्धत महाराष्ट्रातील राजकारणी का अंमलात आणत नाहीत... हा देखील यक्षप्रश्न आहेच...

मुंबई महापालिकेचा कार्यकाळ संपला असला तरी अद्याप निवडणूक जाहीर झालेली नाही. अशावेळी आम आदमी पक्षाने उमेदवार निवडीला सुरुवात केलीय. तसंच सोशल मीडियातून प्रचारही सुरु असल्याचं पाहायला मिळतंय. दिल्लीत केलेल्या विकासाचा मुद्दा घेऊन आप मुंबई महापालिका निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहे. महापालिकेच्या सर्व 236 जागा लढवण्याचा आपचा विचार आहे. त्याचप्रमाणे पुण्यातील सर्व जागांवर तरुण, उच्चशिक्षित उमेदवार. नवे फ्रेश चेहरे. सर्वसामान्यांसाठी काम करणारा पक्ष म्हणून मिळविलेली लोकप्रियता. देशाच्या राजधानीत दिल्लीत सत्तेवर मांड ठोकलेला आम आदमी पक्ष (आप) आता प्रथमच महाराष्ट्राच्या सांस्कृतिक राजधानीत निवडणुकीच्या रिंगणातदेखील उतरण्यासाठी सज्ज झाला आहे. ‘आप’चा झाडू पुण्यात कोणत्या पक्षाला साफ करणार, याचीच उत्सुकता दिवसेंदिवस वाढत आहे. पुण्यातील निवडणूक मुख्यत्वे भाजप आणि महाविकास आघाडी यांच्यात होणार असली, तरी आप, वंचित बहुजन आघाडी आणि एमआयएम यांचे उमेदवार अनेकांची गणिते बिघडविणार आहेत.

स्वच्छ चारित्र्य आणि गुन्हेगारी पार्श्वभूमीवर नसलेले उमेदवार देण्यावर आपचा भर असतो. त्यामुळे चांगलं शिक्षण झालेला आणि गुन्हेगारी पार्श्वभूमी नसलेला उमेदवार आपकडून देण्यात येतो. दुसरीकडे शिवसेनेशी काडीमोड घेतल्यानंतर भाजपने आक्रमक पवित्रा घेतला आहे. भाजपने शिवसेनेची मुंबई महापालिकेतील सत्ता उलथवून टाकण्यासाठी मिशन मुंबई हाती घेतलं आहे. मुंबई मनपावर भाजपचा भगवा फडकवण्याचा निर्धार विरोधीपक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. शिवसेनेच्या नाकावर टिच्चून महानगरपालिकेची आगामी निवडणूक जिंकायचीच, असा चंग यंदा भाजपने बांधला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या नवीन झेंड्याचे अनावरण आणि शिवसेना आणि भाजप यांचा काडीमोड झाल्यापासूनच मनसे-भाजप युतीच्या चर्चा रंगल्या होत्या. मात्र मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि भाजप नेत्यांच्या भेटीगाठींनंतर या चर्चांना हवा मिळत असे. मात्र देवेंद्र फडणवीस यांनी मनसे-भाजप युती होणार नसल्याचे स्पष्ट केलं होतं. तर प्रवीण दरेकर यांनी गरज पडल्यास युती करण्याची तयारी दाखवली होती. सकारात्मक राजकारण करा, नकारात्मक राजकारण करू नका, असा मोठा संदेश दिल्लीच्या जनतेने महानगर पालिकेच्या निवडणूकीनंतर दिला आहे.

## संपादकीय »

### त्रिगुणात्मक त्रिमूर्ती दत्त हा जाणा!

***देवतांना आवाहन करण्यासाठी आपल्या मेंदूत देवतांचे स्थान उत्पन्न केलेले असते. या स्थानांपैकी श्रीदत्तात्रेयांचे स्थान परमोच्च आहे. या ठिकाणी समाधीचा अनुभव घेता येतो, समत्व साधता येते आणि जीवन आरोग्यमय, आनंदमय करता येते. अशा या श्रीदत्तात्रेयांचे ज्या दिवशी विश्वाला भान झाले तो त्यांचा जन्मदिवस म्हणजे श्रीदत्तात्रेयजयंती.***

जीवनामध्ये त्रिसूत्री महत्त्वाची असते. आयुर्वेदामध्ये त्रिदोष असतात; मेंदूचे डावा-उजवा आणि मागचा असे तीन भाग मानले जातात; पृथ्वी, स्वर्ग व पाताळ अशा अस्तित्वाच्या तीन पातळ्या समजल्या जातात; ब्रह्मा, विष्णू व महेश हे तिघे सृष्टीव्यापार चालवतात आणि अशा प्रकारे तीनाचे हे गणित सातत्याने सुरू असते. सद्गुरू श्रीदत्तात्रेय यांना सुद्धा ‘त्रिगुणात्मक त्रिमूर्ती’ या नावाने संबोधले जाते. कारण जीवनाच्या तीनही बाजूंवर त्यांचा प्रभाव असतो. एक बाजू शरीराचे भौतिक व्यापार चालवते. दुसरी बाजू भावनिक व्यवहार चालवते आणि तिसरी बाजू सर्वांना अंतर्भूत करून सर्वांच्या कल्याणाचा म्हणजेच अध्यात्माचा विचार करते.

## मधुमेह नियंत्रणात ठेवताना आहार कसा असावा?

**इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च, म्हणजे आयसीएमआरने 'टाइप-१' मधुमेहाबद्दल मार्गदर्शक सूचना नुकत्याच जाहीर केल्या.**




मधुमेहींना करोनाची लागण जास्त झाली. मृतांचे प्रमाणही त्यांच्यात जास्त होते. आज मधुमेहींच्या संख्येमध्ये भारत हा जगातील क्रमांक दोनचा देश आहे. गेल्या तीन दशकांत, मधुमेहींच्या संख्येत १५० टक्के वाढ झाली. आयसीएमआरने पहिल्यांदाच देशात मधुमेही किती असावेत, यावर शोधनिबंध प्रकाशित केला. त्यात काही धक्कादायक बाबी दिसल्या. प्री-डायबेटिस असलेल्या लोकांची प्रचंड संख्या, ग्रामीण व शहरी भागातील मधुमेहींमधील फरक कमी होत आहे आणि त्याचे निदान होण्याचे वय कमी होत आहे. पूर्वी पन्नाशीनंतर उगवणारा रोग आता अनेकदा पंचविशीत दिसतो.

जगभरात दहा लाख मुले मधुमेही आहेत. त्यांना 'टाइप-१' प्रकारचा मधुमेह आहे. जागतिक मधुमेह फेडरेशनच्या पाहणीनुसार, भारतात 'टाइप-१' मधुमेही मुलांची संख्या जगात सर्वांत जास्त आहे. आपल्या देशात 'टाइप-२', म्हणजे मोठ्या माणसांचा मधुमेह खूप जास्त आहे; पण लहान मुलांचा मधुमेह क्वचित दिसतो असा समज होता. तो चूक निघाला. 'टाइप-२' मधुमेह आता आपण स्वीकारला आहे; पण ज्या मुलांना 'टाइप-१' मधुमेह आहे, त्यांना झालेला आजार हा कलंक नसून, निदान होऊन उपचार करण्यासारखा आहे, हे मानाने आणि समाजाने अजून समाजाने स्वीकारलेले नाही. त्यांच्यासाठी खाणे, पिणे, वावरणे आणि समाजात मिसळणे हे अजूनही एक आव्हान असते. लग्न आणि सोयरिक जमविताना 'टाइप-१' मधुमेह हा अजूनही मोठा अडसर आहे. या पार्श्वभूमीवर, आयसीएमआरच्या मार्गदर्शक सूचना भविष्यासाठी पथदर्शक आहेत. 'टाइप-१' मधुमेह म्हणजे, 'दुर्दैवाने इन्सुलिनशिवाय जगू न शकणारी बिचारी मुले,' ही प्रतिमा बदलून, 'एका आव्हानाचा सामना करणारी भावी पिढी' अशी प्रतिमा निर्माण व्हायला याने मदत होईल.

या निमित्ताने आपल्या सगळ्यांनाच, खास करून मधुमेही मुलांना, त्यांच्या पालकांना आणि डॉक्टरांना मधुमेहाकडे पुन्हा नवीन दृष्टीने पाहण्याची संधी मिळाली आहे. आयसीएमआरने १७६ पानी मार्गदर्शक तत्त्वे प्रसिद्ध केली आहेत. त्यातील सर्व प्रकरणे 'टाइप-१'च्या विविध अंगांविषयी मार्गदर्शन करतात. मधुमेहाचे निदान अजूनही 'अमेरिकन डायबेटिक असोसिएशन'च्या मार्गदर्शक सूत्रानुसार होत असले, तरी तो कसा हाताळायचा, उपचार काय

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥
- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# सीमावादाचे पडसाद संसदेत!

## खासदार आक्रमक, सभापती ओम बिर्ला यांच्या विधानाने आश्चर्य

**। मुंबई । महाईन्यूज ।**

**बेळगावमधील हिरेबागवाडी टोल नाक्याजवळ महाराष्ट्राच्या काही वाहनांवर कन्नड रक्षण वेदिकेच्या कार्यकर्त्यांकडून मंगळवारी (६ डिसेंबर) हल्ला करण्यात आला. या हल्ल्यानंतर महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्न पुन्हा एकदा तापला आहे. या मुद्द्यावरून विरोधक आक्रमक झाले असून शिंदे गट-भाजपा सरकार या मुद्द्याला हातळण्यास सक्षम नसल्याचा आरोप केला जात आहे.**



ठाकरे गटानेही आक्रमक पवित्रा धारण केला असून आम्ही आजपासून सुरू झालेल्या संसदेच्या हिवाळी अधिवेशनातही हा मुद्दा उपस्थित करणार आहोत, अशी माहिती ठाकरे गटाचे खासदार विनायक राऊत यांनी दिली. ते 'टीव्ही ९ मराठी'शी बोलत होते.

(७ डिसेंबर) संसदेच्या हिवाळी अधिवेशनास सुरूवात झाली आहे. या अधिवेशानच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नावर ठाकरे गटाने आक्रमक पवित्रा धारण केला आहे. ठाकरे गटाकडून या प्रश्नाकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच केंद्र सरकारचे लक्ष वेधण्यासाठी प्रयत्न केला जाणार आहे. याबाबात बोलताना "हिवाळी अधिवेशनाचा आजचा पहिला दिवस आहे. राज्यपालांकडून छत्रपती शिवाजी महाराज यांचा अवमान करण्यात आला. हा प्रश्न आम्ही अधिवेशनात उपस्थित करणार आहोत. महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नदेखील चिघळला आहे. कर्नाटक सरकारने महाराष्ट्रातील अनेक गावांतील ग्रामस्थांना डिवचण्याचा प्रयत्न केला आहे,' असा आरोप विनायक राऊत यांनी केला. "महाराष्ट्रातून जाणाऱ्या वाहनांवर दगडफेक केली जात आहे. वाहनं जाळली जात आहेत. महाराष्ट्रातील सीमाभागातील ग्रामास्थांना कर्नाटकमध्ये येण्याचे आमिष दाखवले जात आहे. कर्नाटक सरकारच्या याच भूमिकेविरोधात आम्ही सभागृहात आवाज उठवणार आहोत. आजपासून सुरू होणाऱ्या अधिवेशनात उद्धव ठाकरे गटाचे आम्ही सर्व खासदार संसदेचं, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे लक्ष या गंभीर प्रश्नाकडे वेधण्याचा प्रयत्न करणार आहोत," अशी माहिती विनायक राऊत यांनी दिली आहे.

शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनीही याच मुद्द्यावर शिंदे गट-भाजपा सरकाला लक्ष्य केलं आहे. हे सरकार नामर्द आहे. आम्ही महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नच्या मुद्द्यावरून विरोधकांशी चर्चा करत आहोत. आम्ही राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवर जाण्यास तयार आहोत.

## नवाब मलिका कायद्याच्या कचाट्यात

**। मुंबई । महाईन्यूज ।**

मुंबईतील कुर्ल्यातील मुनिरा प्लंबर आणि तिची आई मरिअम गोवावाला यांची जमीन हडप करण्याबाबत हसीना पारकर, सलीम पटेल व आरोपी नवाब मलिक यांनी कट केला होता, असे दाखवणारे प्रथमदर्शनी पुरावे आहेत', असे निरीक्षण विशेष पीएमएलए कोर्टाचे न्यायाधीश राहुल रोकडे यांनी आपल्या जामीन निर्णयात नोंदवले आहे. 'दाऊदच्या डी या गँगमधील सदस्यांसोबत नवाब मलिक यांनी एकमत करून गोवावाला कंपाऊंड ही जमीन हडप केली आहे अशा आरोपाखाली ईडीने मलिक यांच्याविरोधात पीएमएलए कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी ईडीने त्यांना 23 फेब्रुवारीला अटक करण्यात आली होती. 'ईडीने पीएमएलए कायद्याच्या कलम ५०अन्वये साक्षीदारांचे जबाब व तपासाच्या दरम्यान गोळा केलेले पुरावे हे सर्व आजही मलिक यांच्या कुटुंबीयांच्या मालकीची कंपनी सॉलिडस इन्व्हेस्टमेंट्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या ताब्यात असल्याचे स्पष्ट होत आहे. ईडीकडून पीएमएलए कायद्यातील तरतुदी लावणे उचित आहे', असे निरीक्षणही न्या. रोकडे यांनी आपल्या 43 पानी निकालामध्ये नोंदवले आहे.

## राज्यातील तब्बल १५० गावांना महाराष्ट्र नकोसा

**। नवी दिल्ली । महाईन्यूज ।**

राज्यात गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेला महाराष्ट्र कर्नाटक सीमावाद चांगलाच तापलेला आहे. अशातच धक्कादायक माहिती समोर आली आहे. राज्यातील तब्बल १५० गावांना महाराष्ट्र नकोसा झाला असल्याचे एका अहवालातून समजते.सीमावर्ती भागातील अनेक गावकऱ्यांनी राज्य सरकारला महाराष्ट्र सोडण्याचा इशारा दिला आहे. बुलढाणा जिल्ह्यातील महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशाच्या सीमेवर असलेली भिंगारा, गोमाल-१, गोमाल-२, चाळीसटापरी या चार गावांतील नागरिकांनी सोयीसुविधा मिळत नसल्याच्या कारणावरून मध्य प्रदेशामध्ये जाण्याचा निर्णय घेतला आहे.तत्पुर्वी, सोलापुरातील काही गावांनीही महाराष्ट्र सोडण्याचा इशारा दिला आहे.



सांगली जिल्ह्यातील जाडरबोबलाद, सोन्याळ, उटगी, माडग्याळ, लकडेवाडी, अंकलगी, अंकलगी तांडा, निगडी बुद्रुक, उमदी, सुसलाद, सोनलगी, हळ्ळी, बालगाव, बेळोंडगी, करजगी, बोर्गी, बोर्गी बुद्रुक, अक्कळवाडी, माणिनाळ, गुलगुंजनाळ, मोरबगी, भिवर्गी, कोंत्येवबोबलाद, करेवाडी, तिकोंडी, कागनरी, खंडनाळ, संख, दरीबडची, दरीबडची तांडा, मुचंडी, रावळगुंडवाडी, खोजानवाडी, उमराणी, सिंदूर, बसरगी, गुगवाड, साळमळगेवाडी, वज्रवाड, बिळूर, मेंढेगिरी, वळसंग, कोळगिरी, गुड्डापूर, आसंगी तुर्क, आसंगी बाजार, पांडोझरी, लवंगा, गिरगाव.

तसेच, नांदेड जिल्ह्यातील देगलूर तालुकामधील १३ तर धर्माबाद तालुक्यातील १९ गावांनीही राज्य सरकारला इशारा दिला आहे.

## महाराष्ट्रातून कर्नाटकात जाणारी एसटी सेवा तात्पुरती स्थगित

### प्रवाशांचे हाल

**। मुंबई । महाईन्यूज ।**

**बेळगावच्या हिरेबागवाडी टोल नाक्यावर महाराष्ट्रातून बंगळुरूच्या दिशेने जाणाऱ्या ६ वाहनांवर मंगळवारी दगडफेक करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने मोठा निर्णय घेतला आहे. कायदा आणि सुव्यस्था लक्षात घेता महाराष्ट्रातून कर्नाटकात जाणाऱ्या एसटी सेवा तात्पुरत्या खंडीत करण्यात आल्या आहेत. त्यानुसार, कर्नाटकात जाणाऱ्या येणाऱ्या १४५ एसटी फेऱ्या मंगळवारी रद्द करण्यात आल्या. तसंच, पोलिसांच्या सूचनेनुसार या फेऱ्या आजही रद्द राहणार असल्याची माहिती समोर येत आहे. याचा परिणाम ६६० बस फेऱ्यांवर होणार आहे.**

महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद वाढल्यामुळे राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. तसंच, महाराष्ट्राच्या वाहनांवर दगडफेक झाल्याने राज्यातील वातावरणही तापलं आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने पावलं उचलत महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या एसटी सेवा खंडीत करण्यात आल्या आहेत. पोलिसांकडून पुढील सूचना येईपर्यंत महाराष्ट्र-कर्नाट एसटी सेवा बंद राहणार आहे, अशी माहिती एसटी महामंडळाकडून देण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यापासून महाराष्ट्र कर्नाटक सीमावाद सुरू आहे. हे प्रकरण आता सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे.



असं असतानाच सोलापुरातील जत तालुक्यावर कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी दावा केला आहे. तसंच, अक्कलकोट आणि सोलापूरमधील कन्नड भाषिक भाग कर्नाटकात विलीन करण्याची मागणी केली होती. यावरून महाराष्ट्रातील वातावरण तापले आहे.

दरम्यान, महापरिनिर्वाण दिनाच्या निमित्ताने राज्याचे मंत्री चंद्रकात पाटील, शंभूराज देसाई बेळगावात कार्यक्रमासाठी जाणार होते. परंतु, कायदा आणि सुव्यवस्थेचे कारण देत कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राच्या नेत्यांना बेळगावात न येण्याच्या सूचना केल्या. यावरून वाद उफाळून आला. मंगळवारी, महाराष्ट्रातून बंगळुरूच्या दिशेने जाणाऱ्या सहा वहानांवर कन्नड रक्षण वेदिका संघटनेने हल्ला केला. त्यामुळे परिस्थिती आणखी चिघळली. संभाव्य परिस्थिती लक्षात घेता पोलिसांच्या सूचनेनुसार कर्नाटकात जाणाऱ्या आणि येणाऱ्या १४५ एसटी फेऱ्या रद्द करण्यात आल्या आहेत.

## मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी मानले दिल्लीतील जनतेचे आभार

# 2022 MCD निवडणूक : दिल्ली "आप"ली!

## काँग्रेसला मिळाल्या 9 जागा, AAP ने बहुमताचा आकडा केला पार

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**» MCD निवडणूक निकाल: 'आप'ला बहुमत, 31 जागांवर आघाडी**

**» 15 वर्षांच्या भाजपच्या सत्तेला खिंडार**

AAP ला 134 जागांसह बहुमत मिळाले, भाजपला 104 आणि कॉंग्रेसला 9 जागा मिळाल्या.

एमसीडी निवडणुकीत आम आदमी पक्षाने १३४ जागा जिंकून बहुमताचा आकडा गाठला आहे. त्याचवेळी, आतापर्यंतच्या निकालात भाजपने 104 तर काँग्रेसला 9 जागा मिळाल्या आहेत. मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी दिल्लीतील जनतेचे आभार मानले आहेत

काँग्रेसला 9 जागा मिळाल्या

दिल्ली महानगरपालिकेच्या (एमसीडी) 250 प्रभागांवर झालेल्या निवडणुकीत आम आदमी पक्षाने (आप) 134 जागांसह बहुमताचा आकडा पार केला. तर भाजपने 104, कॉंग्रेसला 9 आणि अपक्ष उमेदवारांनी 3 जागा जिंकल्या आहेत.




### आता महापौरांची पाळी आहे

एमसीडी निवडणुकीच्या निकालानंतर भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) आयटी सेलचे प्रभारी अमित मालवीय यांनी ट्विट केले की, "आता दिल्लीचा महापौर निवडण्याची पाळी आहे. आता हे पाहावे लागेल की कोणाचा निकराच्या लढतीत कोण वरचढ आहे. अमित मालवीय यांनी महापौरपदासाठी भाजपमध्ये अजूनही चढाओढ सुरू असल्याचे संकेत दिले आहेत.आता त्यांचा महापौर कोण होणार हे नगरसेवक ठरवतील.त्याचे उदाहरण देत ते म्हणाले की, चंदीगडमध्ये भाजपचा महापौर असूनही स्थिती चांगली नाही.

### आप'च्या तृतीयपंथी उमेदवाराचा जोरदार विजय...!

सुलतानपूर माजरा हा विधानसभेत उपस्थित असलेल्या तीन प्रमुख वॉर्ड क्रमांक- 42 सुलतानपुरी- ए प्रभागांपैकी एक आहे. येथून आम आदमी पक्षाचे उमेदवार बॉबी किन्नर विजयी झाले आहेत. त्यांनी भाजपच्या एकता जाटव यांचा पराभव केला. आम आदमी पार्टीने बॉबी किन्नरला येथे उमेदवारी दिली होती आणि माजी नगरसेवक संजय यांचे तिकीट नाकारले होते. ही जागा अनुसूचित जातीच्या महिलांसाठी राखीव झाली होती. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाचा दाखला देत आम आदमी पक्षाच्या नेत्यांनी सांगितले की, न्यायालयाने महिलांसाठी राखीव जागांवर निवडणूक लढविण्याचा अधिकार षंढ समाजातील लोकांना दिला आहे. त्यामुळेच आप पक्षाने ही सुवर्णसंधी हातातून जाऊ दिली नाही. सुलतानपुरी-ए प्रभागातून बॉबी किन्नर यांना संधी देऊन आप पक्षाने ही लढत अटीतटीची ठरवली.

---

## गुजरात निवडणुका संपल्या, आता तरी केंद्रातील सत्तापक्षाने 'इलेक्शन फिव्हर'मधून बाहेर पडावे!

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

**मोदी-शाहांचा उल्लेख करत शिवसेनेचा टोला**



शिवसेनेनं जम्मू-काश्मीरमधील सरकारी शिक्षकांना जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या प्रकरणावरुन केंद्रामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली सत्तेत असलेल्या भारतीय जनता पार्टीच्या सरकारला लक्ष्य केलं आहे. गुजरात निवडणुकीच्या निकालाच्या एक दिवस आधीच शिवसेनेनं पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा उल्लेख करत केंद्र सरकावर निशाणा साधला आहे. काश्मीरच्या खोऱ्यात सरकारी नोकरीत असलेल्या ५७ काश्मीर पंडितांची यादी दहशतवादी संघटनेनं जाहीर केल्याच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेनं चिंता व्यक्त केली आहे.

"देशाचे पंतप्रधान आणि गृहमंत्री गुजरात विधानसभेची निवडणूक जिंकण्यासाठी प्राणपणाने व्यूहरचना आखण्यात मश्गूल असतानाच जम्मू-कश्मीरात मात्र पाकपुरस्कृत अतिरेकी संघटनेने कश्मिरी पंडितांच्या हत्याकांडाचे कट-कारस्थान रचल्याची भयंकर बातमी आहे. इकडे केंद्रातील सत्तापक्ष गुजरातच्या प्रचारसभांत, निवडणुकीच्या जोड-तोडीपासून रोड शोपर्यंतचे सूक्ष्म नियोजन करण्यात गुंतला असतानाच तिकडे कश्मीर खोऱ्यात तैनात असलेल्या ५७ कश्मिरी पंडित सरकारी कर्मचाऱ्यांची गोपनीय यादीच दहशतवाद्यांनी आपल्या वेबसाईटवर जाहीर केली आहे. एका अर्थाने ही माहिती फोडून अतिरेक्यांनी कश्मिरी पंडितांची हिटलिस्टच जाहीर केली आहे. कश्मीर खोरे तत्काळ सोडा; अन्यथा टार्गेट किलिंग करू, अशी खुलेआम धमकीच या अतिरेक्यांनी कश्मिरी पंडित-कर्मचाऱ्यांना दिली आहे. मुळात ही यादी अतिरेक्यांपर्यंत पोहोचलीच कशी? केंद्र सरकार व जम्मू-

## बेळगावसह सीमाभाग केंद्रशासित जाहीर करा!

### अन्यथा महाराष्ट्राला वेगळी पावलं उचलावी लागतील : संजय राऊत

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद उफळला असून दोन्ही राज्यातील वातावरण तापलं आहे. याप्रकरणी शिवसेनेचे खासदार संजय राऊत आक्रमक झाले असून त्यांनी केंद्र सरकारकला निर्वाणीचा इशारा दिला आहे. केंद्रात असलेल्या महाशक्तीला सांगणं आहे, ताबडतोब बेळगावसह सीमाभाग केंद्रशासित जाहीर करा, अन्यथा महाराष्ट्राला वेगळी पावलं उचलावी लागतील, असा इशारा राऊतांनी दिला आहे. आज त्यांनी दिल्लीतून माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी भाजपावर निशाणा साधला.



**गेल्या २४ तासांपासून सीमाभागात सरकारी प्रेरणेने वाहनांच्या वाहनांची तोडफोड, हल्ले होत आहेत. आणि प्रतिकार करणाऱ्यां महाराष्ट्र एकीकरण समितीच्या कार्यकर्त्यांच्या घरात घुसून तुरुंगात डांबलं जात आहे. महाराष्ट्रात सरकार आहे की नाही. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री गृहमंत्र्यांच्या भेटीला दिल्लीत जाणार आहेत. पण त्यांना माहित नाहीय का महाराष्ट्रात काय चाललंय? महाराष्ट्राचे लचके सहजतेने तोडता यावेत म्हणून शिवसेनेचं सरकार घालवलं. अशाप्रकारची वेळ महाराष्ट्रावर आली नव्हती.**

गेल्या २४ तासांपासून सीमाभागात सरकारी प्रेरणेने वाहनांच्या वाहनांची तोडफोड, हल्ले होत आहेत. आणि प्रतिकार करणाऱ्यां महाराष्ट्र एकीकरण समितीच्या कार्यकर्त्यांच्या घरात घुसून तुरुंगात डांबलं जात आहे. महाराष्ट्रात सरकार आहे की नाही. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री गृहमंत्र्यांच्या भेटीला दिल्लीत जाणार आहेत. पण त्यांना माहित नाहीय का महाराष्ट्रात काय चाललंय? महाराष्ट्राचे लचके सहजतेने तोडता यावेत म्हणून शिवसेनेचं सरकार घालवलं. अशाप्रकारची वेळ महाराष्ट्रावर आली नव्हती. एवढं हतबल सरकार आणि हतबल मुख्यमंत्री मी आतापर्यंत पाहिला नाही, अशी टीका संजय राऊत यांनी केली. केंद्राच्या पाठिंब्याशिवाय हे होऊच शकत नाही. नाहीतर महाराष्ट्राला वेगळी पावलं उचलावी लागतील. तुमचं सरकार गेलं खड्डयात, असा इशाराच संजय राऊतांनी दिला आहे.

'दोन मंत्र्यांनी काल शेपूट घातलं. कर्नाटकात जाणार होते. हे म्हणे मर्द आणि स्वाभिमान. काय चाललंय राज्यात? डरपोक सरकार आहे. यांना आपल्या महाराष्ट्रतील जनतेची, सीमांची काळजी नाही. महाराष्ट्राच्या सीमा कुरतडत चालल्या आहे. आणि सरकार नामर्दासारखं बसलं आहे. अशावेळेला विरोधी पक्षाची जबाबदारी जास्त आहे. महाराष्ट्राची लूट सुरू आहे. ही लूट दिल्लीच्या चरणी विनासायस अर्पण करावी म्हणून हे सरकार बसवलं आहे. आता कर्नाटकातील मुख्यमंत्री महाराष्ट्रात घुसून दादागिरी करतो. आणि महाराष्ट्रातील मुख्यमंत्री भाई आहेत. त्यांना भाई म्हणतात. मग भाईगिरी दाखवा ना. मग कसले भाई? तुम्ही कधी लाठ्या खालल्या हे दाखवा. लाठ्या खालल्या असतील तर दाखवा महाराष्ट्राला. नाहीतर राजीनामा द्या. या सरकारला सत्तेवर राहण्याचा अधिकार नाही, असं संजय राऊत आक्रमकपणे म्हणाले.

## “माणसात देव असतो ऐकलं होतं अन्...”, उत्कर्ष शिंदेची

लोककलेची पिढीजात परंपरा यशस्वीरित्या सांभाळणारे आजचे आघाडीचे, प्रसिद्ध आणि लोकप्रिय गायक उत्कर्ष शिंदे येणार आहेत. उत्कर्ष शिंदे हा बिग बॉसमुळे प्रसिद्धीझोतात आला. उत्कर्ष शिंदे हा नेहमी काही ना काही कारणामुळे चर्चेत असतो. सध्या उत्कर्ष हा कामानिमित्ताने मारापूर गावात शूटींग करत आहे. नुकतंच त्याने या गावात शूटींग करतानाचा अनुभव सांगितला आहे.

उत्कर्ष शिंदे हा सोशल मीडियावर कायमच सक्रीय असतो. नुकतंच उत्कर्षने काही फोटो शेअर केले आहेत. यासोबत त्याने माणसात देव असतो ऐकलं होत काल देवाच दर्शन घडलं, अशा आशयाखाली एक पोस्ट शेअर केली आहे. त्याची ही पोस्ट सध्या चांगलीच चर्चेत आहे.



शूटिंग साठी आम्ही मंगळवेढे माझ्या गावा नजीक मारापूर येथे शूट करत होतो.संध्याकाळ झाली,सूर्य प्रकाश मंदावला होता .आऊटडोर म्हंटलं कि चाहते आलेच सर्वाना भेटून सर्व सांभाळत शूट सुरु होत आणि त्यातच पाऊस धो धो पडू लागला .कॅमेरा ,ड्रोन ,गिम्बल पावसात कसबस सांभाळत पॅक अप केलं .परत रिसॉर्ट वर पोहोचलो आणि सर्वाना ओढ लागली .मुंबई परतीची .सर्वजण बॅगपॅक करतच होतो कि कानी आवाज पडला “सर कॅमेराची लेन्सकिट कुठे सापडत नाहीये.सर्वांची शोधा शोध सुरु झाली.

## “राजकीय क्षेत्रात काम करताना...”; उर्मिला मातोंडकरांनी सांगितलं पती मोहसिन यांची मिळाली साथ?

अभिनेत्री उर्मिला मातोंडकर यांनी आपले पती आपल्याला प्रत्येक गोष्टीमध्ये कशाप्रकारे पाठिंबा देतात याबाबत खुलासा केला आहे.

सुप्रसिद्ध बॉलिवूड अभिनेत्री आणि शिवसेना नेत्या उर्मिला मातोंडकर यांचा विवाहसोहळा २०१६मध्ये थाटामाटात पार पडला. त्यांनी व्यावसायिक आणि मॉडेल मोहसिन अख्तर मीरशी लग्न केलं. अभिनयक्षेत्रात स्वतःचं एक वेगळं स्थान निर्माण केल्यानंतर त्यांनी राजकीय क्षेत्रात प्रवेश केला. पण उर्मिला यांच्या प्रत्येक निर्णयामध्ये पती मोहसिन यांनी त्यांची साथ दिली. याचबाबत उर्मिला यांनी एका मुलाखतीमध्ये खुलासा केला आहे.



पिंक विलाला दिलेल्या मुलाखतीमध्ये उर्मिला यांनी आपलं पतीसोबत असणारं नातं तसेच त्यांचा आपल्याला असणार पाठिंबा याबाबत सांगितलं. “राजकीय क्षेत्रात काम करताना पती मोहसिन यांनी मला पाठिंबा दिला. ते मला पाठिंबा देत आहेत हे पाहून मलाही धक्काच बसला होता. प्रत्येकवेळी माझं मत सगळ्यांसमोर मांडण्याचं बळ, विश्वास त्यांच्याकडूनच मला मिळाला. याआधी कदाचित मी इतक्या आत्मविश्वासाने कधीच बोलली नसावी. म्हणूनच मी कायम म्हणते मुलगी, पत्नी आणि सून म्हणून मी स्वतःला नशिबवान समजेत.” असं उर्मिला यांनी यावेळी सांगितलं.

## ‘अनन्या’ चित्रपटातील रोमँटिक गाणे प्रदर्शित.. 'न कळता आज..'

शक्य आहे, तुम्ही जे ठरवाल ते शक्य आहे!’ असे म्हणणाऱ्या ‘अनन्या’चा ट्रेलर काही दिवसांपूर्वीच प्रदर्शित झाला होता. आता ‘अनन्या’ चित्रपटातील एक रोमँटिक गाणे सोशल मीडियावर झळकले आहे. हृता दुर्गुळे व चेतन चिटणीस यांच्यात खुलत जाणारे हळूवार नाते यात दिसत आहे. ‘न कळत’ असे या गाण्याचे बोल असून बेला शेंडेचा सुमधूर आवाज या गाण्याला लाभला आहे. तर अभिषेक खणकर यांनी हे गाणे शब्दबद्ध केले असून समीर साप्तीसकर यांनी गाण्याला संगीत दिले आहे. प्रताप फड दिग्दर्शित ‘अनन्या’ चित्रपट येत्या २२ जुलैपासून चित्रपटगृहात प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या गाण्यात एकमेकांविषयी असलेल्या तरल भावना व्यक्त करत एकमेकांना आयुष्यभर साथ देण्याचे वचन देत आहेत. प्रेमीयुगुलांच्या मनाला स्पर्श करणारे हे गाणे अतिशय श्रवणीय आहे.

चित्रपटाचे दिग्दर्शक प्रताप फड गाण्याविषयी म्हणतात, " हृता आणि चेतनवर हे गाणे चित्रित करण्यात आले असून अभिषेकने हे गाणे अगदी साध्या व सोप्या भाषेत मांडण्याचा प्रयत्न केला आहे.




## सिनी शेट्टीने पटकावला ‘MISS INDIA 2022’ खिताब

मुंबईच्या जिओ कन्व्हेन्शन सेंटरमध्ये ‘मिस इंडिया २०२२’ चा ग्रँड फिनाले आयोजित करण्यात आला होता. यानंतर भारताला नवी ‘मिस इंडिया २०२२’ मिळाली आहे. कर्नाटकची सिनी शेट्टी ‘मिस इंडिया २०२२’ची विजेता ठरली आहे. एका शानदार प्रक्रियेनंतर सिनी शेट्टी हिने ‘मिस इंडिया’चा मुकुट आपल्या नावावर केला. त्याचबरोबर, राजस्थानची रुबल शेखावतला मिस इंडिया २०२२ मध्ये फर्स्ट रनर अप घोषित करण्यात आले, तर उत्तर प्रदेशच्या शिनाता चौहान हिला सेकंड रनर अपचा मुकुट देण्यात आला.



यावर्षीच्या मिस इंडिया स्पर्धेत ३१ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता. वेगवेगळ्या राज्यातील मॉडेल्स ‘मिस इंडिया २०२२’चा मुकुट आपल्या नावे करण्यासाठी मैदानात उतरल्या होत्या. यांच्या दरम्यान चुरशीशी स्पर्धा रंगली होती. आपल्या सौंदर्याने आणि बुद्धीने या सर्वच स्पर्धकांनी प्रेक्षकांना घायाळ केले. दरम्यान या संपूर्ण स्पर्धेत काही मॉडेल्सचे नाव चर्चेत राहिले. यामध्ये झारखंडच्या रिया तिर्की हिचा देखील समावेश आहे. काल ‘मिस इंडिया २०२२’च्या ग्रँड फिनालेमध्ये बॉलिवूडच्या अप्सरांनी देखील हजेरी लावली होती. या संपूर्ण इव्हेंटमध्ये मलायकानं आपल्या लुकनं सर्वांचं लक्ष वेधून घेतलं होतं. अनेकांनी तिच्या या लुकचं कौतुक केलं तर काहींना मात्र तिचा हा लुक अजिबात आवडलेला नाही. दरम्यान, नेहा धुपियाने सिल्व्हर गाऊनमध्ये दिसली. ब्लॅक अँड व्हाईट कलर आउटफिटमधला क्रिती सॅननचा लूकही खूपच सुंदर दिसत होता. मिस इंडिया २०२२ ग्रँड फिनालेमधील जजच्या पॅनेलमध्ये एक नव्हे तर सहा सेलिब्रिटींचा समावेश होता, ज्यामध्ये मलायका अरोरा, नेहा धुपिया, दिनो मोरिया, राहुल खन्ना, रोहित गांधी आणि शामक दावर जज म्हणून सामील झाले होते.

## दोन महिन्यात मुख्यमंत्री होतो ही नाही बघा.. 'तमाशा लाईव्ह'चा दमदार ट्रेलर..

गेल्या अनेक दिवसांपासून चर्चेत असलेला चित्रपट म्हणजे 'तमाशा लाईव्ह'. या चित्रपटाचे नावच इतके निराळे आहे की, या चित्रपटाविषयी मनात आपसूकच उत्सुकता निर्माण होते. त्यातच आता या चित्रपटाचा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला असून यात काहीतरी जबरदस्त आणि मनोरंजनात्मक दिसत आहे. 'तमाशा लाईव्ह'मध्ये सोनाली कुलकर्णी, सचित पाटील, सिद्धार्थ जाधव, हेमांगी कवी, पुष्कर जोग, नागेश भोसले, मृणाल देशपांडे, मनमीत पेम, आयुषी भावे, यांच्या प्रमुख भूमिका असून येत्या १५ जुलै रोजी हा भव्य चित्रपट सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे.

यापूर्वीच चित्रपटाच्या संगीताची रसिकांवर भुरळ पडली आहे. आता ट्रेलरही प्रेक्षकांना आवडत असून हा काहीतरी भन्नाट विषय असल्याचे दिसतेय. यात सचित पाटील आणि सोनाली कुलकर्णी वृत्तनिवेदकाच्या भूमिकेत



आहेत. व्यावसायिक कारकिर्दीत आपण किती वरचढ आहोत, हे दाखवण्यात त्यांची चढाओढ सुरु असून त्यात 'ब्रेकिंग न्यूज'साठीची त्यांची धडपड, एकमेकांबद्दल असलेली ईर्षा यात अधोरेखित होत आहे. आता यातून आणखी काही 'ब्रेकिंग न्यूज' आपल्या समोर येणार का, हे 'तमाशा लाईव्ह' पाहिल्यावरच कळेल. याशिवाय राजकीय थरारही या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. यात सिद्धार्थ आणि हेमांगीही महत्वपूर्ण भूमिकेत दिसत आहेत. ट्रेलरमध्ये दिसणारी गाणी कथा पुढे नेणारी आहेत. त्यामुळे या चित्रपटात काहीतरी वेगळे पाहायला मिळणार असल्याचे दिसतेय.

# भारताने बांगलादेशविरुद्धची मालिका तर गमावलीच!

## रोहित शर्माच्या नावावर झाला नकोसा विक्रम

**नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था**



अखेरच्या चेंडूपर्यंत रंगलेल्या लढतीत भारताचा बांगलादेशविरुद्धच्या ५ धावांनी पराभव झाला. या पराभवासह टीम इंडियाने ३ सामन्यांची मालिका देखील गमावली. प्रथम फलंदाजी करत बांगलादेशने भारताला २७२ धावांचे आव्हान दिले होते. मात्र टीम इंडियाला ९ बाद २६६ धावा करता आल्या.

भारताकडून श्रेयस अय्यरने ८२ तर अक्षर पटेलने ५६ धावांचे योगदान दिले. या शिवाय कर्णधार रोहित शर्माने दहाव्या क्रमांकावर येत २८ चेंडूत ५ षटकार आणि ३ चौकारांसह नाबाद ५१ धावांची खेळी केली. पण या तिघांच्या खेळीनंतर देखील टीम इंडियाला विजय मिळवता आला नाही. दुखापतीमुळे रोहितने भारताची गोलंदाजी सुरू असताना मैदान सोडले होते. त्यानंतर तो १०व्या क्रमांकावर फलंदाजीला आला. त्याच्या या वृत्तीचे कौतुक होत असताना दुसऱ्या बाजूला हिटमॅनच्या नावावर एक नकोसा विक्रम झाला आहे. रोहितच्या नावावर एक लाजिरवाण्या विक्रमाची नोंद झाली.

याआधी धोनीच्या नेतृत्वाखाली भारताचा बांगलादेशविरुद्धच्या सलग दोन वनडेत पराभव झाला होता. या यादीत सौरव गांगुली आणि राहुल द्रविड यांचे देखील नाव आहे. भारताला बांगलादेशविरुद्ध सर्वात प्रथम पराभव २००४ साली गांगुली कर्णधार असताना झाला होता. त्यानंतर २००७च्या वर्ल्डकपमध्ये राहुल द्रविड कर्णधार असताना बांगलादेशने भारतावर विजय मिळवला.

धोनीच्या नेतृत्वाखाली भारताचा एकदा नव्हे तर दोनवेळा पराभव झाला. २०१२ साली आणि त्यानंतर तीन वर्षांनी बांगलादेशने भारताचा पराभव केला होता. आता ७ वर्षानंतर बांगलादेशने भारताचा पराभव केला. बांगलादेशविरुद्ध पराभव होणारा रोहित चौथा कर्णधार ठरला आहे. त्याच बरोबर त्यांच्याविरुद्ध सलग दोन वनडे गमावण्याच्या धोनीच्या नकोशा विक्रमाशी रोहितची बरोबरी झाली आहे.

# जिगरबाज मीरा!

## दुखणाऱ्या मनग टाने उचलले 200 किलो वजन

**नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था**

भारताची स्टार वेटलिफ्टर मीराबाई चानू हिने कोलंबियातील बोगोटा येथे झालेल्या वेटलिफ्टिंग वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये रौप्य पदक जिंकले आहे. मीराबाई चानूसाठी ही स्पर्धा सोपी नव्हती कारण ती मनगटाच्या दुखापतीशी झुंज देत होती. टोकियो ऑलिम्पिकच्या रौप्यपदक विजेत्याने 49 किलो गटात स्नॅचमध्ये 87 किलो वजन उचलले. क्लीन अँड जर्कमध्ये त्याचे सर्वोत्तम वजन 113 किलो होते.

चीनच्या जियांग हुइहुआने वेटलिफ्टिंग विश्वचषक स्पर्धेत अव्वल स्थान पटकावले. त्याने 206 किलो (93 किलो + 113 किलो) वजनासह सुवर्ण जिंकले. तर तिची देशबांधव आणि टोकियो ऑलिम्पिक चॅम्पियन होऊ झिहुईने 198 किलो (89 किलो + 109 किलो) वजन उचलून कांस्यपदक जिंकले. दरम्यान मीराबाई चानूने ऑलिम्पिक चॅम्पियन होऊ झिहुईला मागे टाकून 200 किलो (87 किलो + 113किलो) रौप्य पदक जिंकले.




# हातावर टाके पडूनही रोहित शर्मा देशासाठी मैदानात

## पण घात झाला, भारताचे प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी दिली बॅड न्यूज



**मीरपूर । ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**भारतीय संघाला आता पराभवानंतर सर्वात मोठा धक्का बसला आहे. कारण रोहित शर्मा दुखापतीनंतर खेळायला आला आणि या गोष्टीचे वाईट परीणाम आता त्याला भोगावे लागणार आहेत. कारण रोहित शर्माची दुखापत चांगलीच बळावली आहे आणि याबाबतची सर्वात वाईट बातमी आता भारताचे प्रशिक्षक राहुल द्रविड यांना दिली आहे.**

**»रोहित शर्माच्या हाताला दुखापतीनंतर टाके पडले होते.**

**»दुखापत गंभीर असूनही रोहित देशासाठी मैदानात उतरला.**

कर्णधार कसा असावा, याचा उत्तम वस्तुपाठ रोहितने आज दाखवून दिला. जेव्हा संघाला गरज होती तेव्हा तो फलंदाजीला आला होता. रोहित शर्मा आजच्या सामन्यात फक्त दोन षटकेच मैदानात होता. त्यानंतर रोहितच्या अंगठ्याला दुखापत झाली आणि त्यानंतर तो मैदानात आला नाही. पण रोहित नसल्याचा फटका यावेळी भारताला बसला आणि बांगालादेशने २७१ धावा केल्या. पण संघाला गरज असताना रोहित फलंदाजीला आला आणि त्याने भारताला जिंकवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. रोहितने अखेरच्या षटकापर्यंत सामना नेला. पण त्याला हा सामना देशाला जिंकवता आला नाही.

सामना संपल्यावर राहुल द्रविड यांनी सांगितले की, " रोहित शर्माची दुखापत ही गंभीर स्वरुपाची आहे. कारण रोहितच्या अंगठ्याला टाके पडले आहेत. त्यामुळे रोहित जर खेळत राहीला तर त्याची ही दुखापत अजून वाढू शकते. त्यामुळे रोहित आता तिसऱ्या वनडेमध्ये खेळणार नाही, हे जवळपास स्पष्ट झाले आहे. पण रोहित आता कसोटी मालिकेत खेळणार की नाही, याबाबत सध्याच्या घडीला सांगता येऊ शकत नाही. कारण रोहितला दुखापतीमधून सावरण्यासाठी किमान तीन आठवडे लागतील, असे म्हटले जात आहे. त्यामुळे रोहित कसोटी क्रिकेट मालिकेत खेळणार की नाही, हे आता सांगता येणार नाही. पण ही दुखापत गंभीर आहे आणि रोहितला या दुखापतीमधून सारवण्यासाठी काही वेळ नक्कीच द्यावा लागेल."

रोहित शर्माला दुसऱ्या षटकात स्लीपमध्ये असताना दुखापत झाली. ही दुखापत गंभीर स्वरुपाची असल्याचे आता समोर आले आहे. कारण रोहित आता तकिमान तीन आठवडे तरी खेळू शकणार नाही, हे आता स्पष्ट झाले आहे.

### बांगलादेशचा भारतावर सनसनाटी विजय

**भारत आणि बांगलादेश यांच्यात एकदिवसीय मालिकेतील दुसरा सामना ढाका येथे खेळण्यात आला. परंतु या सामन्यात बांगलादेशने भारतीय संघाचा ५ धावांनी पराभव करत सनसनाटी विजय मिळवला आहे. तसेच बांगलादेशने मालिकेत २-० अशी विजयी आघाडी मिळवली आहे. सामन्यातील या पराभवाचा भारतीय संघाला धक्का बसला असून भारताने एकदिवसीय मालिका आपल्या हातातून गमावली आहे. ढाका येथील शेर-ए-बांगला स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या सामन्यात बांगलादेशने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी केली. त्यांनी ५० ओव्हर्समध्ये ७ गडी गमावून २७१ धावा केल्या. बांगलादेशकडून मेहदी हसन मिराजने ८३ चेंडूत १०० धावांची नाबाद खेळी खेळली. तर महमुदुल्लाहने ७७ धावा केल्या. मात्र, प्रत्युत्तरात भारतीय संघ ५० ओव्हर्समध्ये ९ गडी गमावत २६६ धावाचं करू शकला. त्यामुळे भारताने ही मालिका थोडक्यासाठी आपल्या हातातून गमावली आहे.**